# - प्रकरण ७ वे -

## : समारोप :

छ. शिवाजी महाराजानी महाराष्ट्रात सह्याद्रीच्या आश्रयाने स्वराज्याची स्थापना केली. त्यांच्या मृत्यूनंतर लगेच मराठयाचे हे चिमुकले राज्य नष्ट करण्यासाठी छ. संभाजीच्या काळात औरंगजेब बादशहा सर्व सामर्थ्यानिशी महाराष्ट्रात उतरला. आजपर्यंत स्वराज्यावर आलेल्या संकटा-पैकी हे संकट सर्वात मोठे होते. मराठयांचे राज्य पूर्ण नष्ट करण्याच्या ईर्षेनेच औरंगजेबाने त्यांच्यावर झंजावाती आक्रमणास सुरुवात केली. मराठयांनी बादशहाचे हे आव्हान स्विकारले. कारण औरंगजेबाचे हे आक्रमण म्हणजे तात्पुरती मोहीम नव्हती, त्याच्याकडे तडजोड नव्हती, वाटाघाटी नव्हत्या, तह नव्हता, तर होता तो पूर्ण नाश! सर्वस्वाचा शेवट! आणि म्हणूनच मराठयांनी आपल्या अस्तित्वासाठी, अस्मितेसाठी व स्वातंत्र्यासाठी जिद्दीने व ईर्षेने त्याला तीव्र प्रतिकार सुरु केला. हा मोगल-मराठा संघर्ष महाराष्ट्राच्या भूमीत पंचवीस वर्षे चालला. बादशहास साम्राज्याचा सर्व खजीना, सर्व फौज तसेच सर्व प्रतिष्ठा खर्ची घालून सुध्दा हा प्रदेश जिंकता आला नाही. त्याला पूर्ण अपयश आले. त्याचा मृत्यू झाल्यावरच तो संघर्ष थांबला.

मराठयांच्या या स्वातंत्र्य युध्दात अनेक मराठा वीरानी, मुत्सद्दयानी व सेनानीनी भाग घेतला. मराठयांच्या स्वातंत्र्य युध्दात थोडे मागून उदयास आलेला, परंतु स्वातंत्र्य युध्दाच्या शेवटच्या पर्वात अप्रतिम पराक्रम करुन प्रसिध्दीस आलेला पराक्रमी सेनानी व मुत्सद्दी म्हणजे परशुराम त्र्यंबक प्रतिनिधी हा होय.

परशुराम त्र्यंबकाचा जन्म त्या काळातील प्रांत वाई सम्मत कोरेगांव मौजे किन्हई येथे एका गांवचे कुलकर्णीपद संभाळणा-या ब्राह्मण कुटुंबात झाला. परंपरागत कुलकर्णी पद संभाळण्या इतपत त्याचे शिक्षण झाले. त्याच्या तरुण वयातच छ. शिवाजी महाराजांचा राज्य उभारणीचा उद्योग सुरु होता. त्या धडामोडीचे संस्कार परशुराम त्र्यंबकाचे जन्मगांव त्याच परिसरात असल्यामुळे झाले असावेत.

याच काळात परशुराम त्र्यंबक हा छ. शिवाजी महाराजांच्या अष्टप्रधान मंडळातील प्रधान रामचंद्रपंत निळकंठ यांच्या पदरी कारकून म्हणून नोकरीस लागला. एका प्रधानाकडे कारकूनी करत असल्यामुळे त्यास या काळात राज्यकारभार मुलूखगिरी, मुत्सद्देगिरी याचे शिक्षण व अनुभव मिळाला.

छ. राजारामाच्या कारकीर्दीत परशुराम त्र्यंबकाच्या उदयास सुरुवात झाली. रामचंद्रपंत अमात्य म्हणजे मराठयांच्या स्वातंत्र्य युध्दात मराठी राज्यात लाभलेले एक वरदानच होते. त्याने महाराष्ट्रात कर्त्या पुरुषाची एक पिढीच निर्माण केली. त्याने अनेक जुने सरदार मार्गी लावले. नव्या सरदारांना व मुत्सद्दयांना प्रोत्साहन देऊन राष्ट्रकार्यास जुंपले. परशुराम त्र्यंबकाच्या बाबतीत हेच झाले. कारकूनी करणा-या या माणसाकडे अनेक गुण आहेत. याची पारख पंत अमात्यानी करुन त्यास एकाहून एक अवघड व महत्वाची कामे देण्यास सुरुवात केली. परशुराम त्र्यंबक त्यात यशस्वी होत गेला, व मराठयांच्या स्वातंत्र्य युध्दातील एक सेनानी व मुत्सद्दी म्हणून चमकला. मराठयांच्या स्वातंत्र्य युध्दात त्याने राष्ट्रकार्य केलेच पण छत्रपतीने निर्माण केलेल्या "प्रतिनिधी" या सर्वश्रेष्ठ पदावर त्याची नेमणूक झाली. प्रतिनिधी पदाची उत्पत्ती केंव्हा झाली याबाबत तज्ज्ञांत मतभेद आहेत. मात्र राजारामाच्या काळापासून त्या पदाचा प्रभाव मराठयांच्या

राजकारणात व राज्यकारभारात पडलेला स्पष्टपणे दिसतो. परशुराम त्र्यंबक छत्रपतींचा प्रतिनिधी झाल्यानंतर त्याने आपल्या कर्तबगारीने या पदास प्रतिष्ठा मिळवून दिली. त्यामुळेच छ.शाहूच्या काळात हे प्रतिनिधी-पद त्याच्या घराण्यात वंशपरंपरेने देण्यात आले. तसेच छ.शाहूने त्यास मोठी जहागीर सुध्दा दिली.

परशुराम त्र्यंबकानंतर त्याच्या मुलाकडे श्रीपतरावकडे प्रतिनिधिपद आले. त्यानंतर परशुराम त्र्यंबकाचा कनिष्ठ पुत्र जगजीवनराव याच्याकडे ते पद होते. शाहूच्या काळातच मराठयांच्या राज्यात पेशव्यांचा उदय झाला. पेशव्यांनी हळूहळू छत्रपतीची सत्ता आपल्या हातात घेण्याचा प्रयत्न केला. या होत असलेल्या घटनात्मक बदलास व पेशव्यास सातारच्या प्रतिनिधी घराण्याने अगदी शेवटपर्यंत विरोध केला. त्यामुळे छत्रपती नामधारी बनून सर्व सत्ता पेशव्यांच्या हातात गेली. प्रतिनिधीने विरोध केला परंतु त्याचा उपयोग झाला नाही. साहजिकच नामधारी छत्रपतींचे प्रतिनिधी सुध्दा पुढे नामधारी बनत गेले. त्यांची जहागीर सुध्दा कमी कमी होत गेली.

## छ.राजाराम व परशुराम त्र्यंबक :

परशुराम त्र्यंबकाचा उदय राजारामाच्या कारकीर्दीत झाला. सेनापती व मुत्सद्दी म्हणून त्यांने केलेले पहिले महत्वाचे काम म्हणजे इ.स.१६९२ मध्ये मोगलांकडून पन्हाळा जिंकून घेतला हे होय. पन्हाळा हे त्या काळात दक्षिण महाराष्ट्रातील प्रमुख ठाणे होते. परशुराम त्र्यंबकाने एका रात्रीतच त्या किल्ल्यावर छापा घालून तो घेतला. हे त्याचे वैशिष्टय होय. या पराक्रमाबद्दल छ.राजारामाने त्यास " समसेरबहाद्दर " हा किताब दिला. यानंतर रामचंद्रपंत अमात्याने त्याच्याकडे युध्दाची, प्रशासकीय

व सारा वसूलीची कामे सोपवण्यास सुरुवात केली. स्वराज्याचा दक्षिण भाग म्हणजे सातारा व रायगड यांच्या दक्षिणेच्या प्रशासनाची जबाबदारी छ.राजारामाने रामचंद्रपंत अमात्यावर टाकली होती. पण अमात्याने ती परशुराम त्र्यंबकावर सोपवल्याचे दिसते. इ.स. १६९८ मध्ये मूळ स्वराज्याचा सर्व प्रदेश व किल्ले मराठयांच्या ताब्यात आले. छ. राजारामास जिंजीस राहणे अवघड झाले म्हणून तो महाराष्ट्रात परत आला. "हुकमतपन्हा" रामचंद्रपंत अमात्य, शंकराजी नारायण सचिव व परशुराम त्र्यंबक प्रतिनिधी या कारभारी, मुत्सद्दी व सेनानी मंडळीवर त्यांच्या कामगीरीमुळे छ.राजाराम खुष झाला. सातारा येथे मराठी राज्याची राजधानी स्थापून त्याने आपले नवे अष्टप्रधान मंडळ घोषीत केले. पूर्वपरंपरेने चालत आलेली पदे त्या त्या घराण्यात चालवली.

परशुराम त्र्यंबकास देण्यासाठी पद नव्हते म्हणून त्यावेळी रिकामे असणारे "प्रतिनिधीपद" त्यास दिले. अशाप्रकारे राजारामाच्या काळात परशुराम त्र्यंबक हा प्रतिनिधी झाला. त्याने आपल्या कर्तुत्वाने प्रतिनिधी पदास प्रतिष्ठा प्राप्त करुन दिली. पुढे हे पद त्याच्याकडून दोन-तीनदा काढून घेतले गेले. पण पुन्हा त्यास देण्यात आले. शेवटी छ.शाहूने त्यास प्रतिनिधी पद वंशपरंपरेने वतनी करुन दिले.

अशाप्रकारे राजारामाच्या काळामध्ये उदयास येऊन थोडया काळातच साध्या कारकूनापासून परशुराम त्र्यंबकाने स्वकर्तृत्वाने व अंगच्या गुणाने अगदी अल्पावधीतच मराठयांच्या राज्यातील मानाने व दर्जाने पेशव्यापेक्षा सुध्दा श्रेष्ठ असलेले "प्रतिनिधीपद" मिळवले. यातूनच त्याच्या अंगी असणा-या कर्तृत्वाची, गुणांची, पराक्रमाची व मुत्सद्देगिरीची ओळख पटते.

ताराबाई व परशुराम त्र्यंबक प्रतिनिधी :

छ. राजाराम इ.स. १६९८ मध्ये महाराष्ट्रात परत आल्यानंतर मराठयांनी आपले बचावाचे धोरण सोडून देऊन आक्रमक धोरण स्विकारले. याच काळात औरंगजेबाने मराठयांची पाळेमुळे खणून काढण्यासाठी मराठयांचे किल्ले घेण्याची मोहीम स्वत:च्या नेतृत्वाखाली सुरु केली. साताराच्या किल्ल्यास औरंगजेब वेढा घालून बसला असतानाच मराठयांच्या-वर पुन्हा संकट कोसळले ते म्हणजे छ. राजारामाचा मृत्यू. औरंगजेबास वाटले. आता मराठयांचे नेतृत्व करणारे कोणी नाही. आपण सहजासहजी हे राज्य घेऊ, परंतु त्याचे हे स्वप्न अपूर्ण राहिले.

छ. राजारामाची पत्नी ताराबाई हिने मराठयांचे नेतृत्व स्वीकारुन मोगला विरुध्दचा लढा चालू ठेवला. राजारामाच्या मृत्यूच्या वेळी औरंगजेबाने सातारा किल्ल्यास वेढा दिला होता. तो किल्ला लढवणा-या मराठयांना परशुराम त्र्यंबक हा परळी किल्ल्यावरुन मदत व मार्गदर्शन करीत होता. शेवटी परशुराम त्र्यंबकाने वाटाघाटी करुन सातारा व नंतर परळी हे किल्ले मोगलांच्या स्वाधीन केले. तेथून पुढेच मोगलांचा सहयाद्रीच्या परिसरातील निसर्गाचे रौद्र स्वरुप दिसले. परशुराम त्र्यंबक राजाराम काळात मुख्य प्रधान होता. ताराबाईने आपला मुलगा शिवाजी दुसरा याचे राज्यारोहण करुन राज्यकारभारास सुरुवात केली. याच वेळी रामचंद्र पंत अमात्य व ताराबाई यांच्यात शिवाजीच्या मुंज प्रकरणावरुन मतभेद झाले. परशुराम त्र्यंबकाने त्यात तडजोड घडवून आणली. या घटनेमुळे ताराबाईचा परशुराम त्र्यंबकावरील विश्वास वाढला. तेथून पुढे राज्य-कारभारात सर्वांच्या पेक्षा परशुराम त्र्यंबकाच्या सल्ल्यास ती अधिक महत्त्व देऊ लागली. तिने परशुराम त्र्यंबकास पुन्हा प्रतिनिधी केले. यावेळी मराठयांच्या कारभाराचे केंद्र विशाळगड होता. औरंगजेबाने विशाळगडास

वेढा दिला. तो किल्ला लढवण्याची जबाबदारी परशुरामपंतावर सोपवून ताराबाई प्रतापगडी गेली. विशाळगडचा मोगलांचा वेढा व मराठयांनी आतून व बाहेरुन मोगलांना केलेला तीव्र प्रतिकार, चिवट झुंज हे मराठयांच्या स्वातंत्र्य युध्दातील रोमहर्षक प्रकरण होय. या वेढयात परशुराम त्र्यंबकाच्या सर्व गुणास कस लागून ते प्रकट झाले. त्याच्या आजवरच्या पराक्रमावर कळस शोभावा असाच हा पराक्रम होता.

मराठयांनी मोगलांच्या बरोबर किल्ले लढवताना एक धोरण ठरवले होते. " किल्ल्यास मोगलांचा वेढा पडल्यानंतर तो चिवटपणे झुंजवायचा बादशहाची मोठी फौज किल्ल्या भोवती अडकवून ठेवावयाची, फौजेची रसद तोडायची, तीच्यावर वेळी अवेळी छापे घालायचे. किल्ला लढवणे अवघड होऊ लागले की वाटाघाटी करावयाच्या व पैसे घेऊन किल्ला मोगलांना द्यावयाचा, तोही पावसाळा तोंडावर आल्यावर म्हणजे पुन्हा पावसाने मोगली फौज हैराण होत असे." येथे ही परशुरामपंताने नेमके तसेच केले. किल्ला पाच-सहा महिने लढवून जूनमध्ये मोगलांच्या ताब्यात दिला. कोकणच्या या दुर्गम प्रदेशातील पावसाने, वा-याने व ओढया नाल्याना आलेल्या पूराने मोगलांना अक्षरश: झोडपून काढले.

इ.स. १७०४ पासून औरंगजेबाने आपले लक्ष बेरडांच्याकडे वळवले. त्यांच्यावर मोहीम काढली. या काळात परशुराम त्र्यंबक प्रतिनिधी, शंकराजी नारायण यांनी स्वराज्यातील बरेचसे किल्ले पुन्हा हस्तगत केले होते. बेरडांचा बंदोबस्त करुन बादशाहा परतत असताना देवापूर येथे आजारी पडला. नंतर तो पेडगांव मार्गे अहमदनगरास गेला. तेथेच २१ फेब्रुवारी १७०७ रोजी त्याचा मृत्यू झाला. पंचवीस वर्षापूर्वी सुरू झालेल्या मराठयांच्या स्वातंत्र्य युध्दाची समाप्ती झाली. या घटनेने महाराष्ट्राच्याच नव्हेतर भारताच्या इतिहासात वेगळे वळण लागले.

छ.शाहू व परशुराम त्र्यंबक प्रतिनिधी :

औरंगजेबाच्या मृत्यूनंतर त्याच्या कैदेत असलेल्या संभाजी पुत्र शाहूची सुटका झाली. हिंदुधर्म परंपरेप्रमाणे शाहू हा मराठी राज्याच्या खरा वारस होता. छ.राजारामाने सुध्दा तसे समजूनच राज्यकारभार केला. ताराबाई मात्र हा वारसा हक्क मानावयास तयार नव्हती. शाहूची सुटका झाल्यानंतर त्यास मराठयाचे सिंहासन मिळू नये व आपला मुलगा शिवाजी हाच छत्रपती राहावा यासाठी तीने अनेक खटपटी व लटपटी केल्या. अनेक युक्तीवाद लढवले. परंतु कशाचाच कांही उपयोग होत नाही हे पाहिल्यावर त्याच्या बरोबर संघर्षाची तीने तयारी केली. त्यामुळे मराठयांच्या राज्यात यादवी सुरु झाली. आजपर्यंत एकमेकावर विश्वास ठेवून एकमेकांच्या खांदयाला खांदा लावून लढणारे सरदार, एकमेका विरुध्द लढण्यास सिध्द झाले. अविश्वासाचे वातावरण निर्माण झाले. "राष्ट्र प्रमुख" च्या अविवेकीपणाची झळ सर्व राष्ट्रास सोसावी लागते. त्यांच्यातील मतभेद व संघर्ष संपूर्ण राष्ट्राचे समाजजीवन ढवळून काढतो, परिणामी त्या राष्ट्राचे त्या समाजाचे प्रचंड नुकसान होते." तीच स्थिती मराठयांच्या राज्याची झाली. यादवीत ते एकमेकाविरुध्द झुंजत राहिले. सरदार, मुत्सद्दी, कारभारी यांचे गट व पक्ष तयार झाले. स्वार्थासाठी प्रत्येकजण धडपडू लागला. राज्यनिष्ठ स्वराज्य निष्ठ व तात्विक माणसाना निर्णय घेता आला नाही. परिणामी शंकरजी नारायण!

शाहू येताच मराठयांच्यात ताराबाईचा व शाहूचा असे दोन पक्ष झाले. परशुरामपंत प्रतिनिधीने पहिल्यापासून अगदी निष्ठेने व विश्वासाने ताराबाई-चा पक्ष धरला. अनेक मराठा सरदारच नव्हे तर राज्याचा सेनापती धनाजी जाधव मिळाला तरी परशुरामपंताने आपली निष्ठा ताराबाईवर अढळ ठेवली.

ताराबाईचा एकनिष्ठ सेवक म्हणून परशुराम त्र्यंबक प्रतिनिधीने धन्यावर दाखवलेली अढळ निष्ठा कौतुकास्पद होती.

यादवी युध्दात शाहूची सरसी होत गेली. शाहूविरूध्द सातार्‍याचा किल्ला लढवत असतानाच परशुरामपंत कैद झाला. ताराबाईने पन्हाळा किल्ल्यावर मराठयांच्या दुस-या गादीची स्थापना केली. शाहूच्या मवाळ धोरणामुळे त्याने ती टिकू दिली. ताराबाईने परशुराम त्र्यंबकाचा जेष्ठ पुत्र कृष्णाजी परशुराम यास आपले प्रतिनिधी नेमले. त्यामुळे पुढे पंताने छ.शाहू महाराजांच्या बरोबर वाटाघाटी करून त्यांचे प्रतिनिधीपद स्विकारले. छत्रपतींच्या वारसा तंटयातून त्याच्या सातारा व कोल्हापूर अशा दोन गादया निर्माण झाल्या. या दोन्ही छत्रपतींच्याकडे एकाच कुटूंबातील प्रतिनिधी नेमण्यात आले. साताराकडे परशुराम त्र्यंबक तर कोल्हापूरकडे त्यांचे जेष्ठ पुत्र कृष्णाजी परशुराम. अशाप्रकारे एकाच घराण्याच्या प्रतिनिधीच्या सातारा व कोल्हापूर येथे दोन शाखा निर्माण झाल्या. पुढे सातारा व कोल्हापूर छत्रपतीनी या प्रतिनिधीना आपआपल्या राज्यात वंशपरंपरागत मोठया जहागीरी दिल्या. त्यामुळे पुढील काळात त्यांना सातारा प्रतिनिधी व विशाळगडकर प्रतिनिधी असे संबोधले जाऊ लागले. या दोन्ही शाखानी आपआपल्या धन्याची इनामे इतबारे सेवा केल्याचे दिसते.

यादवी युध्दाच्या काळात सगळीकडेच अविश्वासाचे व संशयाचे वातावरण असल्यामुळे काही काळ परशुरामपंतावर शाहूची अवकृपा होऊन ते पद त्याला गमवावे लागले व पुन्हा कैदेत पडावे लागले. अशाही स्थितीत परशुराम त्र्यंबकाचा द्वितीय पुत्र श्रीपतराव हा मात्र शाहूच्या पक्षास राहून निष्ठेने कार्य करत होता. कृष्णराव खटावकरा विरूध्दच्या मोहीमेतील त्याच्या पराक्रमामुळे परशुरामपंताची सुटका होऊन पुन्हा त्यास सचिव, मुख्य प्रधान व प्रतिनिधी पद मिळाले. येथून पुढे ते त्याच्याकडे त्याच्या

मृत्यूपर्यंत राहिले. इ.स. १७१४ मध्ये प्रतिनिधीपद परशुरामपंताच्या घराण्यात छ.शाहूने वंशपरंपरेने वतनी करून दिले. तेथून पुढे परशुराम पंताकडून विशेष पराक्रम झाल्याचे दिसत नाही. या पदावर असतानाच इ.स. १७१८ मध्ये त्याचा मृत्यू झाला.

रामचंद्रपंत अमात्यांच्या सहवासात परशुराम त्र्यंबकाचा उदय झाला. रामचंद्रपंता बरोबरही परशुरामपंताचे काही वेळा मतभेद झाले. औरंगजेबाच्या पत्राने त्यात भर घातली पण दोघेही मुत्सद्दी, दूरदृष्टीचे व तडजोड करणारे असल्यामुळे ते मतभेद विकोपाला गेले नाहीत.

अशाप्रकारे परशुराम त्र्यंबक मराठ्यांच्या राज्यातील सर्वश्रेष्ठ पदापर्यंत जाऊन राजा व राज्य यांची सेवा करत असतानाच मृत्यू झाला. मराठ्यांच्या स्वातंत्र्य युध्दातील एक श्रेष्ठ दर्जाचा सेनानी, दूरदृष्टीचा मुत्सद्दी व कारभारी तसेच मराठ्यांच्या इतिहासावर आपला ठसा उमटवणारा कर्ता पुरुष म्हणून परशुराम त्र्यंबकास मराठ्यांच्या इतिहासात महत्वाचे स्थान आहे.

छ.शाहू व श्रीपतराव प्रतिनिधी :

परशुरामपंत प्रतिनिधीच्या मृत्यूनंतर त्याचा पुत्र श्रीपतराव सातारा छत्रपतींचा प्रतिनिधी झाला. प्रतिनिधी होण्यापूर्वीच त्याचा पराक्रम नजरेस भरला होता. बाळाजी विश्वनाथाच्या मृत्यूनंतर बाजीरावास पेशवेपद देण्यास श्रीपतरावाने प्रतिनिधीने विरोध केला. त्यातील त्याचा दृष्टीकोन योग्यच होता. एकोणीस वीस वर्षाच्या या तरुण पोरावर केवळ बापाचे कर्तृत्व म्हणून राज्याच्या मुख्य प्रधानाची जबाबदारी सोपवणे योग्य नाही. असे त्याचे मत होते. ते त्याने स्पष्टपणे भर दरबारात सांगितले. याचा

अर्थ असा की कोणतेही पद योग्यता व लायकी बघून द्यावे. हाच या पाठीमागचा आग्रह होता. पण काही इतिहासकार श्रीपतराव प्रतिनिधीस या त्याच्या धोरणाबद्दल त्यास दोष देतात. मत्सरापोटी त्याने बाजीरावास विरोध केला असे म्हणतात. पण येथे एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की यावेळी त्याच्या मनात बाजीरावाविषयी मत्सर असण्याचे कांहीच कारण नव्हते. उलट त्याने बाळाजी विश्वनाथाच्या हाताखाली राहून पराक्रम केले होते. बाळाजीने त्याचे पराक्रम शाहूच्या कानावर घालून त्याच्या बापाची सुटका करुन घेतली व त्याच्याच घरात प्रतिनिधीपद पुन्हा देण्याविषयी शाहूस सुचवले होते. म्हणजे दोन्ही घराण्याचा चांगला लोभ होता असे असताना बाजीरावास पेशवेपद देताना श्रीपतरावने बाजीरावास पाठींबाच द्यावयास हवा होता. पण केवळ कर्तव्य बुध्दीने, राष्ट्रहिताच्या दृष्टीने त्याने बाजीरावास विरोध केला. याचा अर्थ एवढाच की ज्याच्या हातून एखादीही जोखमेची कामगिरी पार पडली नाही त्यास हे महत्वाचे पद देऊ नये, हे श्रीपतरावचे स्पष्ट मत होते. केवळ पुढील इतिहासावरुन श्रीपतरावने बाजीरावास प्रारंभी मत्सराने विरोध केला असे म्हंटले जाते ते योग्य नाही.

श्रीपतराव व बाजीराव यांच्यात सुरुवातीपासून तेढ वाढत गेली. याचे कारण श्रीपतरावने बाजीरावास पेशवाई मिळताना केलेला कर्तव्यदक्ष विरोध. पण ही अढी बाजीरावाच्या मनातून शेवटपर्यंत निघाली नाही. त्यामुळे मराठेशाहीचे अपरिमित नुकसान झाले.

श्रीपतराव व बाजीराव यांच्यात उत्तर व दक्षिण हा एक गाजलेला वाद होता. याची सविस्तर चिकित्सा मागे आलीच आहे. तत्कालीन राजकीय परिस्थितीचा विचार केला असता प्रतिनिधीचे दक्षिण धोरणच योग्य होते, राष्ट्रहिताचे व राष्ट्रबुध्दीचे होते असे म्हणावे लागते. श्रीपतरावचे दक्षिण धोरण न स्विकारता उत्तर धोरण स्विकारल्यामुळे मराठेशाहीचे जे अनेक तोटे झाले ते सर्वश्रुतच आहे.

श्रीपतराव प्रतिनिधीच्या वेळी शाहूच्या दरबारात पेशवा व प्रतिनिधी असे दोन पक्ष निर्माण झाले. सर्व सरदार, अष्टप्रधान, कारभारी त्यात विभागले गेले. पुढे जुन्या सरदाराचे चांगले सहकार्य मिळत नाही असे दिसल्यानंतर पेशव्याने अनेक नव्या मराठा सरदाराना प्रोत्साहन देऊन राष्ट्रकार्यास जुंपले. परंतु याचा परिणाम असा झाला की, या नव्या सरदारांचा व कारभाऱ्यांचा तो स्वत: स्वामी होऊन बसला. या सरदारांच्या निष्ठा छत्रपतीपेक्षा पेशव्यावर जास्त होत्या. परिणामी पेशव्याच्या या धोरणामुळे व वागण्यामुळे छत्रपतीचे महत्त्व दिवसें दिवस कमी होत गेले.

श्रीपतरावाने आपल्या कारकीर्दीत कर्नाटकाच्या सर्व मोहीमात भाग घेतला होता. त्याचा महत्वाचा पराक्रम म्हणजे त्याने छ.संभाजी व त्याचे सरदार यांचा केलेला पूर्ण पराभव हा होय. त्यामुळेच वारणेचा तह होऊन खऱ्या अर्थाने मराठ्यांच्या यादवीचा शेवट झाला. श्रीपतरावाने जंजिऱ्याच्या सिद्दीवरील मोहीमेत भाग घेऊन त्याच्याकडे असणारा रायगड जिंकून घेतला. पण पुढे पेशव्याने त्याच्या या मोहीमेत अनेक अडथळे आणाले. त्यामुळे ती पाहिजे तेवढी यशस्वी न होताच श्रीपतरावाला परत यावे लागले. येथून पुढे कांही किरकोळ मोहीमा वगळता त्यांने काही कामगिरी केल्याचे दिसत नाही. शेवटपर्यंत शाहूजवळ दरबारात असणे, नित्य राजदर्शनास जाणे व राजाबरोबर सल्ला मसलत करणे असे त्याचे उतारवयातील दिवस गेले. छ.शाहूचा श्रीपतराव प्रतिनिधीवर फार लोभ होता.

जगजीवनराव प्रतिनिधी व सांगोला तह :

श्रीपतराव प्रतिनिधीच्या मृत्यूनंतर त्यास मुलगा नसल्यामुळे त्याचा धाकटा भाऊ जगजीवनराव यास सातारा छत्रपतींचे प्रतिनिधीपद मिळाले. तो

श्रीपतराव इतका अनुभवी नसल्यामुळे त्यांचा मुतालीक यमाजी शिवदेव याच्या सल्ल्यानेच वागत असे. जगजीवनराव प्रतिनिधी झाल्यानंतर सुध्दा खुद्द छत्रपती शाहू प्रतिनिधीचा आदर राखात होते हे त्यांच्या एका आज्ञेवरुन दिसते. " प्रतिनिधीना आम्ही आमच्या जागी मानतो कृष्णोचे उदक त्यांच्या हातावर सोडा " हीच ती आज्ञा होय. याचा अर्थ असा की छ.शाहूच्या मृत्यूपर्यंत कर्तृत्वाने पेशवा प्रबळ झाला असला तरी मान व दर्जा या दृष्टीने शाहूच्या दरबारात प्रतिनिधी चे पद हे पेशव्याहून श्रेष्ठ मानले जात होते. हे अगदी स्पष्ट होते. त्यास दुस-या पुराव्याची आवश्यकता नाही.

छ.शाहूच्या मृत्यूनंतर मराठयांच्या राज्यकारभारात सांगोल्याच्या तहामुळे एकप्रकारची राजकीय व घटनात्मक क्रांतीच घडून आली. छ.शाहूने मराठी राज्याच्या सूत्र चालकत्वाची पेशव्यास सनदच दिली होती. यामुळे पेशव्यास आपोआप कांही हक्क प्राप्त झाले होते. तसेच त्यांच्यावर महत्वाच्या जबाबदा-याही येऊन पडल्या होत्या. पण पुढे पेशव्याने छ.रामराजाच्या साक्षीने आपल्या हिताचे अनेक ठराव लेखी करुन घेतले. त्यामुळे छत्रपती नामधारी बनून मराठी राज्याची सर्व सत्ता पेशव्याच्या हातामध्ये एकवटली. एकटया प्रतिनिधीने त्या बदलास विरोध केला. पण त्याचा उपयोग झाला नाही. प्रतिनिधीस पेशव्यापुढे शारणागती स्विकारली. लागली. सांगोल्याच्या व्यवस्थेमुळे सत्तेचे छत्रपतीकडून पेशव्याकडे सत्तांतर झाले. जेथे खुद्द छत्रपतीच नामधारी झाला तेथे छत्रपतीच्या प्रतिनिधीची काय अवस्था!

सांगोला तहा नंतर पेशव्यानी मराठी राज्याची सर्व सत्ता आपल्या हाती घेतली. यास जबाबदार कोण? खुद्द छ.शाहू की पेशवा ? छ.रामराजा की पेशवा ? ताराबाई की रामराजा की दरबारातील

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

अष्टप्रधान ? असे प्रश्न उपस्थित होतात. यात कोणाही एकाला जबाबदार धरता येणार नाही. कमी जास्त प्रमाणात वरील पैकी प्रत्येकजण त्यास जबाबदार आहेत. तथापि पेशवे सर्वस्वी निर्दोष होते. त्यांनी राज्याचे हित व संरक्षण डोळयापुढे ठेवूनच आपल्या हातात सत्ता घेतली, असे मुळीच म्हणवत नाही. उलट पेशव्यानी राष्ट्रहित, स्वामीहीत बाजूस सारुन स्वार्थापोटी आपल्या बाजूने कौल देणारी, विरोधकांना खच्ची करणारी व परिणामी राष्ट्रहितास बाधक ठरणारी व्यवस्था करुन घेतली. त्याचे परिणाम केवळ त्यांनाच नव्हेतर सर्व राज्यास एका तपाच्या आतच पानिपतवर भोगावे लागले.

अशाप्रकारे सातारा प्रतिनिधींचा मराठयांच्या राजकारणामध्ये व राज्यकारभारामध्ये महत्वाचा सहभाग होता. मराठयांच्या राजकारणातील सातारा प्रतिनिधींची कामगिरी प्रशंसनीय आहे, आपला वेगळा ठसा उमटवणारी आहे.

--------x--------